महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय पुणे (गृहशाखा)
एविंग, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, ससुन हॉस्पीटल समोर, पुणे- ४११ ००१
ईमेल.homebranchpune@gmail.com

वाचले:-

१) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी त्यांचेकडील क्र. जि.वा. शाखा/पुणे ग्रामीण/वाहतुक वळविणेबाबत/१६/२०२६ दि.१३/०१/२०२६ रोजीचे पत्र.

२) मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतूद.

३) शासन गृह विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.एम.व्ही.ए.०५८९/सीआर-१०६०/टीआर-२, दि.१९/०५/१९९०.

---

क्र. पगक/कावि/ १७ /२०२६ दिनांक - १६/०१/२०२६.

**विषय :- "पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६" सायकल स्पर्धा स्टेज ३ अंतर्गत रस्त्यांवरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत.**

अधिसूचना

**ज्याअर्थी,** वाचले क्र.१ अन्वये पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ चे अनुषंगाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत विनंती केली आहे. पुणे जिल्हा प्रशासन यांच्या विद्यमाने व सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने **"पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६"** हि सायकल स्पर्धा दि.२२ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. स्टेज -३ मधील सासवड, जेजुरी, सावड निंबाळकर,सुपा, माळेगाव, बारामती तालुका व बारामती शहर असे एकूण १३७ कि.मी अंतर असून सदर स्पर्धा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता वाहतुक वळविणे अत्यंत गरजेचे असलेने संबधीत स्टेज ३ साठी खालील प्रमाणे वाहतुक वळविणेत येत आहे.

**त्याअर्थी मी, जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे मला मोटार वाहन कायदा-१९८८ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार व शासन गृह विभागाचे दि.१९/०५/१९९० चे अधिसूचनेनुसार मला प्राप्त अधिकाराने होणाऱ्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकल स्पर्धा २०२६ चे अनुषंगाने** स्टेज ३ साठी खालील प्रमाणे वाहतुक वळविण्याचे आदेश देत आहे.

- सासवड पोलीस स्टेशन:-

१) **हडपसर सासवड जेजुरी रोड:-** सदर रोडवरील वाहतुक चंदनटेकडी पासून सासवड कडे जाणारी वाहतुक पुर्णपणे बंद करुन सर्व वाहतुक बायपासने बोरावके मळा अशी बाह्यवळण मार्गाने वळविण्यात येत आहे.

२) **सासवड कापूरहोळ रोड:-** स्पर्धोच्या दिवशी सासवड कापूरहोळ मार्गावरील सासवड कडून कापूरहोळ कडे जाणारी वाहतुक पानवडी गाव पास होईपर्यंत पुर्णपणे बंद करुन सदरची सर्व वाहतुक चंदनटेकडी बायपास-बोरावके मळा-वरी फाटा-परिंचे-वीर-मार्ग कापूरहोळ अशी वळविण्यात येत आहे.

३) **सासवड कोंढवा मार्ग:-** सासवड शहर पास करुन कोंढवा कडे जाणारी सर्व वाहतुक बोरावके मळा बायपास चंदनटेकडी दिवे घाट मार्गे वळविण्यात येत आहे.

४) सासवड वीर मार्गवरील वाहतुक चंदनटेकडी बायपास बोरावकेमळा वरी फाटा मार्गे वळविण्यात येत आहे.

५) कापूरहोळ कडून सासवड कडे येणारी वाहतुक हि कापूरहोळ फाट्यावरुन कात्रज घाट मार्गे वळविण्यात येत आहे.

६) खेड शिवापूर मार्गे मरिआई घाट मार्गे सासवड कडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येत आहे.

७) गोगलवाडी मार्गे चतुर्मुख घाट आणि पठारवाडी घाट मार्गे भिवरी किंवा बारवडी गार्मे सासवड कडे येणारी वाहतुक बंद करण्यात येत आहे.

८) यवत बाजुकडून भुलेश्वर घाट मार्गे सासवड कापूरहोळ कडे जाणारी वाहतुक भुलेश्वर फाटा येथून हडपसर मंतरवाडी फाटा मार्गे कात्रज बंगलोर महामार्गकडे वळविण्यात येत आहे.

९) शिंदवणे घाट गार्गे सासवड कापूरहाळ कडे जाणारी वाहतुक उरुळीकांचन तळवडी चौक येथून हडपसर मंतरवाडी फाटा मार्गे कात्रज बेंगलोर महामार्गाकडे वळविण्यात येत आहे.

१०) वीर उमाजी नाईक चौक येथे येथे वाठार कॉलनी मार्गे येणारी वाहतुक हद्दीतून सारोळाकडे वळविण्यात यावी.

११) राजगड पोलीस ठाणे हद्दीतून न्हावी भोंगवली मार्गे परिंचे धनकवडी रोड कडे येणारी वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

१२) राजगड पोलीस ठाणे हद्दीतून किकवी पाचलिगे मार्गे बांदलवाडी काळदरी कडे येणारी वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

**सासवड पोलीस स्टेशन हद्दीत नगरपरिषद परिसर येथे दिनांक २१/०१/२०२६ रोजी पासून रात्री २२/०० ते दि.२२/०१/२०२६ रोजी रात्री २०/०० वा पर्यंत सर्व प्रकारची जड-अवजड वाहनांना येण्यास मनाई करण्यात येत आहे.**

- जेजुरी पोलीस स्टशेन:-सदर स्पर्धे दरम्यान जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतून खालील प्रमाणे वाहतुक वळविणे/बंद करणे आवश्यक आहे.

१) सायकलिंग स्पर्धावेळी सातारा मार्गे नगर/केडगाव चौफुला कडे जाणारी सर्व वाहतुक खालील पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:-** लोणंद-फलटण-बारामती-भिगवण-केडगाव चौफुला मार्गे नगर अशी वळविण्यात येत आहे.

२) सासवड मार्गे बारामती व सातारा जाणारी सर्व वाहतुक खालील पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:-** बेलसर फाटा-बेलसर गाव-नाझारे कप-पांडेश्वर-आंबी-सुपा-उंडवडी-बारामती-फलटण-सातारा अशी वळविण्यात येत आहे.

३) फलटण लोणंद येथून जेजुरी मार्गे पुणे येथे जाणारी सर्व वाहतुक खालील पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:-** फलटण-लोणंद-शिरवळ मार्गे पुणे अशी वळविण्यात येत आहे.

- **वडगाव निंबाळकर पोलीस स्टशेन:-** सदर स्पर्धे दरम्यान वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीतून खालील प्रमाणे वाहतुक वळविणे/बंद करणे आवश्यक आहे.

१) बारामती-निरा ते सातारा जाणारी वाहतुक हि बारामती येथूनच फलटण मार्गे वळविण्यात येत आहे. तसेच बारामतीचे पुढील स्थानिक वाहतुक जी निरा गार्गे लोणंद, सातारा जाते ती करंजेपुल चौक येथून वाणेवाडी-मुरुम ता बारामती -मुरुम ता फलटण-काळज-लोणंद अशी वळविण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:** बारामती ते निरा-लोणंद-सातारा जाणारी वाहतुक बारामती येथून फलटण मार्गे वळविण्यात येत आहे बारामती ते करंजेपूल वाणेवाडी मुरुम ते काळज पुढे लोणंद मार्गे सातारा
**पर्यायी मार्ग:** सातारा ते लोणंद निरा बारामती जाणारी वाहतुक लोणंद येथून फलटण मार्गे वळविण्यात येत आहे.

**सायकल स्पर्धा दरम्यान खालील वाहतुक स्पर्धा संपेपर्यंत पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.**

१) निरा कॉर्नर/बारामती कॉर्नर (वडगाव निबांळकर पो.स्टे)
२) चौधरवाडी फाटा (वडगाव निबांळकर पो.स्टे)
३) वाकी फाटा, मोढवे (वडगाव निबांळकर पो.स्टे)
४) जोगवडी फाटा मुर्टी (वडगाव निबांळकर पो.स्टे)
५) मोराळवाडी फाटा, मुर्टी (वडगाव निबांळकर पो.स्टे)
६) पळशी/लोणीभापकर फाटा, मुर्टी (वडगाव निबांळकर पो.स्टे)
७) जेजुरी पो स्टे हद्दीतील मुळूंचे गावातील वाहतुक

- **सुपा पोलीस स्टेशन:-** सदर स्पर्धा दरम्यान सुपा पोलीस स्टेशन हद्दीतून खालील प्रमाणे वाहतुक वळविणेत /बंद करणे आवश्यक आहे.

१) शिरुर-सातारा हायवे मार्गावरील वाहतुक खालील प्रमाणे वळविणे आवश्यक आहे.

**पर्यायी मार्ग:** केडगाव चौफुला-पाटस-खराडेवाडी-उंडवडी सुपे-बारामती-फलटण-सातारा अशी वळविण्यात येत आहे.

२) सासवड-मोरगाव बारामती गार्मावरील वाहतुक खालील प्रमाणे वळविणे आवश्यक आहे.
**पर्यायी मार्ग:** सासवड-कुंभारवळण-पारगाव-पिसर्वे-राजुरी-नायगाव-रिसे पिसे-सुपा-उंडवडी सुपे-बारामती अशी वळविण्यात येत आहे.

३) सासवड वरुन जेजुरी मार्गे बारामती कडे जाणारी वाहतुक खालील पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:**सासवड-बेलसर फाटा-बेलसर-पारगाव-पिसर्वे-सुपा-उंडवडी सुपे-बारामती अशी वळविण्यात येत आहे.

- **बारामती तालुका पोलीस स्टेशन:-**

१) इंदापूर बारामती रोडने बारामती कडे येणारी वाहतुक काटेवाडी ब्रीज येथे बंद करुन ती वाहतुक काटेवाडी कमानी तून उजव्या बाजूने काटेवाडी गावातून कन्हेरी गाव मार्गे जळोची ब्रीजवरुन बारामती कडे वळविण्यात येत आहे. तसेच सोनगाव बाजूकडून येणारी वाहतुक काटेवाडी ब्रीजखालून कन्हेरी मार्गे जळोची ब्रीज वरुन बारामती कडे वळविणे तसेच पालखी महामार्गावरुन होणारी सर्व वाहतुक स्पर्धा सुरु झाल्यापासून ते समाप्त होईपर्यंत बंद करण्यात येत आहे. तसेच इंदापूर रोडने बारामती कडे येणारी अवजड वाहतुक वालचंदनगर हद्दीत बंद करण्यात येत आहे.

२) भिगवण बारामती रोडने भिगवण बाजुकडून बारामती (पेन्सिल चौका) कडे येणारी वाहतुक स्व.गोपिनाथ मुंढे चौक येथे बंद करुन संत तुकाराम महाराज पालखी मार्गाने कटफळ चौक-आरटीओ-ऑफिस चौक-पेन्सिल चौक मार्गे बारामती कडे वळविण्यात येत आहे. तसेच भिगवण बाजुकडून एमआयडीसी बारामती कडे येणारी अवजड वाहतुक भिगवण येथे बंद करण्यात येत आहे.

३) बारामती भिगवण रोडने बारामती बाजुकडून भिगवण बाजुकडे येणारी सर्व वाहतुक पेन्सिल चौकातून आरटीओ ऑफिस मार्गे एमआयडीसी रोडने पुढे कटफळ चौकातून संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाने स्व.गोपिनाथ् मुंढे चौकातून भिगवण बाजूकडे वळविण्यात येत आहे.

४) बारामती एम.आय.डीसी मध्ये बारामती भिगवण रोडने होणारी वाहतुक हि पेन्सिल चौकातून आरटीओ ऑफिसमार्गे वळविण्यात येत आहे. बारामती एम.आय.डी.सी मध्ये भिगवण बारामती रोडने होणारी सर्व वाहतुक हि स्व.गोपिनाथ मुंढे चौकातून कटफळ चौक मार्गे वळविण्यात येत असून सदरची वाहतुक हि स्पर्धा सुरु झाल्यापासून शेवट होईपर्यंत सर्व वाहतुक वळविण्यात येत आहे.

५) रुई गावातुन बारामतीकडे येणारी व बारामती कडून रुई गावाकडे जाणारी सर्व वाहतुक हि रुई महादेव मंदिरापासून निर्मिती विहार मार्गे आढयातून बनकर वडेवाले अभिमन्यु कॉर्नर येथून गदीमा रोडने पेन्सिल चौक या ठिकाणी वळविण्यात येत आहे.

६) पाटस बाजुकडून बारामती एम.आय.डी.सी या ठिकाणी येणारी सर्व जड वाहतुक हि यवत पोलीस स्टेशन हद्दीत पाटस येथे बंद करण्यात येत आहे.

**वाहतुक खालील प्रमाणे बंद करण्यात येत आहे.**

१) पालखी महामार्गावरील काटेवाडी चौक
२) पालखी महामार्गावरील जळोची ब्रिज येथून पालखी महामर्गावर येणार सर्व वाहतुक
३) पालखी महामार्गावरील कुरणवस्ती सावळ याठिकाणी असलेल्या चौकातून पालखी महामार्गावर येणार सर्व वाहतुक
४) पालखी महामार्गावरील रुई ब्रिज येथून पालखी महामार्गावर येणारी सर्व वाहतुक
५) पालखी महामार्गावरील वंजारवाडी ब्रिज येथून पालखी महामार्गावर येणार सर्व वाहतुक
६) भिगवण बारामती रोडवरील स्व्.गोपिनाथ मुंढे चौक वंजारवाडी येथे
७) बारामती एम.आय.डी सी मधुन डायनामिक्स चौक याठिकाणी भिगवण बारामती भिगवण रोडवर येणारी सर्व वाहतुक
८) बारामती भिगवण रोडवर पेन्सिल चौक एम.आय.डीसी बारामती याठिकाणी
९) बारामती भिगवण रोडवरुन रुई बाजुकडे जाणारी वाहतुक
१०) संदीप कॉर्नर येथून अभिमन्यु कॉर्नर रोडची येणारी जाणारी सर्व वाहतुक

**बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीत विद्या प्रतिष्ठान प्रशाला परिसर येथे दि.२१/०१/२०२६ रोजी पासून रात्री २२/०० ते दि.२२/०१/२०२६ रोजी रात्री २०/०० वा पर्यंत सर्व प्रकारची जड-अवजड वाहनांना येण्यास मनाई करण्यात येत आहे.**

सदर स्पर्धे दरम्यान बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतून खालील प्रमाणे वाहतुक वळविणे/बंद करणे आवश्यक आहे.

१) पुणे-मोरगाव कडून बारामतीकडे येणारी वाहतुक मोरगाव-सुपा-कारखेल-ब-हाणपुर मार्गे वळविण्यात येत आहे.

२) बारामती -पुणे बाजुस जाणारी वाहतुक बारामती पाटस रोड मार्गे वळविण्यात येत आहे.

३) फलटण कडून-बारामतीकडे येणारी वाहतुक हि पाहुणेवाडी माळेगावकडे वळविण्यात येत आहे. तसेच फलटण कडून भिगवण इंदापूर कडे जाणारी वाहतुक सांगवी, गोखळी, सोनगाव मार्गे इंदापूर भिगवण रोडकडे विळविण्यात येत आहे.

४) बारामती कडून फलटणकडे जाणारी वाहतुक एम.आय.डी सी कन्हेरी सोनगाव मार्गे फलटणकडे वळविण्यात येत आहे.

५) इंदापूरकडून-बारामतीकडे येणारी वाहतुक -कन्हेरी सावळगार्गे भिगवण रोडकडे वळविण्यात येत आहे.

६) बारामतीकडून इंदापूरकडे जाणारी वाहतुक तांदुळवाडी रोडमार्गे एम.आय.डी सी रोडने भिगवण रोडकडे वळविण्यात येत आहे.

७) भिगवण कडून बारामतीकडे येणारी वाहतुक वंजारवाडी पालखी मार्गे पुलापासून एम.आय.डी सी मार्गे वळविण्यात येत आहे.

८) बारामतीकडुन भिगवणकडे जाणारी वाहतुक तांदुळवाडी रोडने एम.आय.डी.सी रोडने वंजारवाडी पालखी मार्गे पुलापासून भिगवण रोडकडे वळविण्यात येत आहे.

९) गुणवडी बी.के.बी.एन रोड गुणवडी कडून बारामतीकडे जाणारी वाहतुक सोनगाव पासून काटेवाडीकडे वळविण्यात येत आहे.

१०) बारामतीकडुन बी.के.बी.एन गुणवडी रोडकडे जाणारी वाहतुक तांदुळवाडी रोडने एम.आय.डीसी रोडने वंजारवाडी पालखी मार्गे पुलापासून विभगवन रोडकडे वळविण्यात येत आहे.

११) निरा रोडकडून बारामतीकडे येणारी वाहतुक माळेगाव मार्गे सांगवी, मेखळी, सोनगावकडे वळविण्यात येत आहे.

स्टेज ३ करीत **"पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६"** अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता दि.२२/०१/२०२६ रोजी सकाळी ०८/०० वा ते सायंकाळी १८/०० वा वरील प्रमाणे सर्व प्रकारची वाहतुक स्पर्धा संपेपर्यंत वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेत व वाहतुक बंद करणेचा आदेश देणेत येत आहे.

**सदरची अधिसूचना आज दि. १६/०१/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.**

जिल्हादंडाधिकारी सत्यमेव जयते पुणे

Jitendra

(जितेंद्र डूडी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हादंडाधिकारी, पुणे**

**प्रति,**

**पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण,** चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे,

२/- प्रस्तुत आदेशानुसार वाहतुक वळविल्याचे फलक बसविण्याचे कार्यवाहीसाठी रवाना तसेच जे रस्ते पुर्णपणे बंद केले आहेत त्या ठिकाणी कायदा व सुव्यव्सथेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षत घ्यावी.

प्रत - १. मा. अवर सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई

२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

३. मा. प्रधान सचिव, परिवहन, महाराष्ट्र राज्य , मंत्रालय, मुंबई

४. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मंत्रालय, मुंबई

६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.

७. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वारगेट, पुणे.

८. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.